॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

■ अहिल्यानगर ■ सोमवार, दि. ३० मार्च २०२६ ■ वर्ष ६ वे ■ अंक ३१४ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145 www.veerbhuminews.com

✲ सुविचार ✲

संयम नावाच्या कटू वृक्षाचे फळे नेहमी गोड असतात.



वाढवण बंदरात १२०० एकरावर आंतरराष्ट्रीय कृषी बाजारपेठ उभारणार !

पान क्र. २ वर



अंधारलेल्या आयुष्यांना आनंदऋषी नेत्रालयाकडून जीवनात प्रकाश

पान क्र. ३ वर



प्रताप ढाकणेंचा 'जय श्रीराम'चा नारा तर आ. राजळेंनी वाजविलेला ढोल चर्चेत

पान क्र. ४ वर

# जिल्ह्यासाठी 'ऑरेंज' व 'येलो' अलर्ट

## शेतकऱ्यांची चिंता वाढली । नागरिकांना सतर्कतेचे आवाहन

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**

भारतीय हवामान खात्याने जिल्ह्यात दि. ३० व ३१ मार्च, २०२६ या कालावधीत तुरळक ठिकाणी वीजांच्या कडकडाटासह वादळे, सोसाट्याचा वारा व गारपीटीची शक्यता व्यक्त केली असून जिल्ह्यासाठी 'ऑरेंज अलर्ट' जारी करण्यात आला आहे. तसेच दि. १ व २ एप्रिल २०२६ या कालावधीत वीजांच्या कडकडाटासह वादळे, मध्यम पाऊस व वाऱ्याचा वेग वाढण्याची शक्यता असल्याने 'येलो अलर्ट' घोषित करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गिते यांनी केले आहे.



मेघगर्जना, वीजा चमकणे किंवा वादळी वारे असताना झाडाखाली उभे राहू नये; सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. वादळाच्या वेळी कोणतेही विद्युत उपकरण वापरू नये व विद्युतवाहक वस्तूंपासून दूर राहावे.

मोकळे मैदान, टॉवर्स, विद्युत खांब, ट्रान्सफॉर्मर, धातूचे कुंपण यांजवळ थांबू नये. जाहिरात फलक (होर्डिंग्ज) परिसरात थांबणे टाळावे. वीजा चमकत असताना उघड्यावर असल्यास गुडघ्यावर बसून शरीराचा जमिनीशी संपर्क कमी ठेवावा. धरण, नदी किंवा कालव्यांच्या पाण्यात उतरू नये; धोकादायक ठिकाणी सेल्फी घेणे टाळावे.

शेतकऱ्यांनी पाऊस व गारपीट लक्षात घेऊन शेतीमालाचे संरक्षण व साठवणूक करावी.बाजार समितीत आणलेला माल सुरक्षित ठेवण्याची खबरदारी घ्यावी.जनावरांना सुरक्षित ठिकाणी हलवावे. नागरिकांनी वादळी वारे, वीज, पाऊस व गारपीट यापासून स्वतःचे व जनावरांचे संरक्षण करण्यासाठी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी नजीकच्या पोलीस स्टेशन किंवा तहसील कार्यालयाशी संपर्क साधावा. तसेच जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय अहिल्यानगर येथे टोल फ्री क्रमांक १०७७ तसेच ०२४१-२३२३८४४ अथवा २३५६९४० या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

## SPOT NEWS

### १ एप्रिलपासून पॅनकार्डचे नियम बदलणार

● **नवी दिल्ली –** येत्या १ एप्रिल २०२६ पासून नवे आर्थिक वर्ष सुरू होत आहे. या नव्या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीपासून अनेक आर्थिक बदल होत आहेत. आयकर कायदा २०२५ च्या तरतुदींची नव्या वर्षात अंमलबजावणी केली जाणार आहे. यात पॅन कार्डची आवश्यकता आणि आर्थिक रक्कम मर्यादा यासंदर्भातील नियमात फेरबदल करण्यात आले आहेत. या बदलांचा प्रमुख उद्देश छोट्या रकमेच्या व्यवहारांना सुलभ करणे आणि मोठ्या रकमेच्या व्यवहारांमध्ये पारदर्शकता आणणे हा आहे. त्यामुळे येत्या काळात गुंतवणूक, खरेदी किंवा प्रवासाचे नियोजन करीत असाल तर बदलांविषयी माहिती असणे आवश्यक आहे. आधीच्या नियमावलीनुसार १० लाख रुपयांपर्यंतच्या मालमत्तेची खरेदी-विक्री करायची असल्यास पॅनकार्डचा उल्लेख करणे अनिवार्य होते. मात्र, १ एप्रिलपासून ही मर्यादा २० लाख रुपये करण्यात आली आहे. यामुळे छोट्या शहरांमध्ये कमी किमतीतील जमीन खरेदी करायची असल्यास कागदपत्रांची पूर्तता करण्यामध्ये दिलासा मिळेल. वाहनांची खरेदी करण्यासाठीच्या नियमात बदल करून दिलासा देण्यात आला आहे. आता ५ लाखांपेक्षा अधिक किंमत असलेल्या वाहनांच्या खरेदीसाठी पॅनकार्ड द्यावे लागेल. यापूर्वी प्रत्येक चारचाकी वाहनाच्या खरेदीसाठी पॅनकार्ड आवश्यक होते. आता परडवणाऱ्या ४ वाहनांच्या आणि दुचाकी खरेदीसाठी ही प्रक्रिया सोपी होणार आहे.

### रुपाली चाकणकरांचा पाय खोलात

● **मुंबई –** भोंदू अशोक खरातची चौकशी करणाऱ्या विशेष तपास पथकाने (एसआयटी) राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांना समन्स बजावले आहे. त्यामुळे रुपाली चाकणकर यांच्यावर चौकशी व त्यानंतर अटकेची टांगती तलवार उभी राहिल्याचा दावा केला जात आहे. अशोक खरातशी असणाऱ्या कथित संबंधांवरून रुपाली चाकणकरांना प्रथम राज्य महिला आयोगाचे अध्यक्षपद व त्यानंतर राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदावरून राजीनामा द्यावा लागला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे व राष्ट्रवादीच्या नेत्या रुपाली ठोंबरे पाटील यांनी या प्रकरणी नाशिकच्या पोलिस अधिकाऱ्यांची भेट घेऊन रुपाली चाकणकर यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांना सहआरोपी करण्याची मागणी केली होती. यामुळे पोलिसांवरील विशेषत: या प्रकरणाचा तपास करणाऱ्या विशेष तपास पथकावरील दबाव वाढला होता. या वृत्तानुसार, भोंदू अशोक खरातच्या शिवनिका संस्थान, मिरगाव या ट्रस्टवर सदस्य असल्याप्रकरणी रुपाली चाकणकर यांना हे समन्स बजावण्यात आले आहे. या प्रकरणी या ट्रस्टच्या सर्व आजी-माजी सदस्यांची चौकशी होणार असल्याची माहिती आहे. दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली ठोंबरे पाटील यांनी प्रस्तुत प्रकरणात रुपाली चाकणकर या कायद्याने सहआरोपी असल्याचा दावा केला आहे. कारण, त्यांचा या प्रकरणात असणारा प्रत्यक्ष हितसंबंध, त्यांनी पोलिसांवर टाकलेला दबाव व त्या स्वत: राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा म्हणून त्या ट्रस्टवर होत्या.

# देशात पेट्रोल पंपांवर मिळणार आता रॉकेल



● **नवी दिल्ली । वीरभूमी –**

युद्धामुळे एलपीजीच्या पुरवठ्यासंदर्भात केंद्र सरकार विविध उपाययोजना करीत आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक गॅस मंत्रालयाने पेट्रोल पंपांवर केरोसीन म्हणजेच रॉकेलची विक्री करण्यास परवानगी देण्याचा निर्णय घेतला. युद्धामुळे पेट्रोलियम सुरक्षा आणि लायसेंसिंग नियमात सूट देण्यात आली असून, या संदर्भात राजपत्र जारी केले आहे.

केंद्र सरकारच्या या नियमानुसार प्रत्येक जिल्ह्यात सरकारी मालकीच्या तेल मार्केटिंग कंपन्यांच्या दोन पेट्रोल पंपांवर ५ हजार लिटर रॉकेलचा स्टॉक ठेवण्यास परवानगी देण्यात आली आहे. अन्नपदार्थ बनवणे आणि दिव्यांसाठी वापराच्या उद्देशाने सर्वसामान्यांना रॉकेल विक्री करण्यास परवानगी देण्यात आली आहे. रॉकेलच्या विक्रीला ६० दिवसांची परवानगी देण्यात आली आहे. सरकारी मालकीच्या तेल मार्केटिंग कंपन्यांची संख्या तीन आहे. म्हणजेच एखाद्या तेल मार्केटिंग कंपनीच्या २ पेट्रोल पंपावर रॉकेल मिळेल. एका पेट्रोल पंपावर २५०० लिटर रॉकेलचा साठा करता येईल.

### या राज्यांत रॉकेल विक्रीला परवानगी?

■ दिल्ली, चंदीगड, हरियाणा, पंजाब, दादरा नगर हवेली, दमन आणि दीव, पाँडिचेरी, आंध्र प्रदेश, अंदमान निकोबार, राजस्थान, उत्तर प्रदेश, गोवा, गुजरात, उत्तराखंड, लक्षद्वीप, जम्मू आणि काश्मीर, लडाख, तेलंगणा, हिमाचल प्रदेश, नागालँड, मध्य प्रदेश, सिक्कीम या राज्यांना रॉकेल विक्रीला परवानगी दिली आहे.

भारत सरकारने गेल्या काही वर्षांत टप्प्याटप्प्याने रॉकेलची विक्री मर्यादित केली होती. २०१५ नंतर उज्ज्वला योजना आणि सौभाग्य योजनेद्वारे एलपीजी आणि वीज कनेक्शन दिले. त्यामुळे रेशन दुकानांमधून अनुदानावर दिले जाणारे रॉकेल टप्प्याटप्प्याने बंद करण्यात आले.

# नगर शहरात व्यावसायिकावर हल्ला प्रकरणी चौघांविरूध्द गुन्हा दाखल

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**

दुचाकीला कट मारल्याच्या किरकोळ कारणावरून एका व्यावसायिकावर लाकडी दांडक्याने हल्ला केल्याची घटना शनिवारी (२८ मार्च) रात्री ९:१० वाजताच्या सुमारास अहिल्यानगर- मनमाड रस्त्यावरील सावेडी परिसरातील हॉटेल संजोग समोर घडली. शेख मोहसीन अब्दुल कादर (वय ४१, रा. जुने कलेक्टर ऑफिस जवळ, हातमपुरा, अहिल्यानगर) असे जखमी व्यावसायिकाचे नाव असून त्यांच्यावर खासगी रूग्णालयात उपचार सुरू आहेत.

याप्रकरणी त्यांचा चुलत भाऊ शेख फिरोज ईस्माईल (वय ५०, रा. जुने कलेक्टर ऑफिस जवळ, हातमपुरा) यांनी दिलेल्या फिर्यादीरून अनोळखी चार जणांविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात रविवारी (२९ मार्च) पहाटे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेख मोहसीन अब्दुल कादर हे मनमाड रस्त्यावरील आपले मोबाईलचे दुकान बंद करून दुचाकीवरून घरी परतत होते. रात्री ९:१० वाजेच्या सुमारास संजोग लॉनजवळ एका अज्ञात दुचाकीस्वाराने त्यांच्या दुचाकीला कट मारला. यावरून झालेल्या शाब्दिक वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. संबंधित अज्ञात इसमाने फोन करून आपल्या तीन मित्रांना घटनास्थळी बोलावून घेतले. या चौघांनी मोहसीन यांना शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली.

या वादात एकाने मोहसीन यांच्या डोक्यात लाकडी दांडक्याने जोरात प्रहार केला, ज्यामुळे ते गंभीर जखमी झाले. घटनेनंतर संशयित आरोपी तिथून पसार झाले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या मोहसीन यांना तातडीने जिल्हा रूग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र पुढील उपचारासाठी त्यांना खासगी रूग्णालयात हलवण्यात आले आहे. सध्या त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहे. पोलिसांनी गुन्हा नोंद केला असून मारहाण करणार्यांचा शोध सुरू केला आहे.

# मंत्रिपद मिळावे म्हणून नीलम गोऱ्हेंनी घेतली खरातची भेट : तृप्ती देसाई

● **पुणे । वीरभूमी –**

अशोक खरात प्रकरणाची व्याप्ती वाढत असताना, सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. गोऱ्हे खरातला अनेक वर्षांपासून ओळखत होत्या आणि कोरोनापूर्वी त्यांची भेट घेऊन भविष्य बघितल्याचा दावा देसाईंनी केला. महिलांवरील शोषणाच्या या गंभीर प्रकरणात नीलम गोऱ्हेंनी आतापर्यंत शांत का राहिल्या, यावर देसाईंनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

महिलांच्या लैंगिक शोषणाचा, त्यांच्यावर अत्याचार केल्याचा आरोप असलेल्या भोंदू अशोख खरात प्रकरणाची व्याप्ती वाढतच चालली असून या केसमुळे संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली आहे. अनेक राजकारणी, नेते, सेलिब्रिटी हे खरातला भेटायला यायचे अशी माहितीदेखील समोर आली होती. यामध्ये रुपाली चाकणकर, दीपक केसरकर यांचे नाव आत्तापर्यंत अनेकवेळा समोर आले असून चाकणकरांना तर राज्य महिला आयोगाचे अध्यक्षपद आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचाही राजीनामा द्यावा लागला. आता याप्रकरणात एक नवी अपडेट समोर आली असून सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी विधानपरिषदेच्या उपसभापती, शिवेसान (शिंदे गट) नेत्या नीलम गोऱ्हे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत.

नीलम गोऱ्हे या अशोक खरातला गेल्या अनेक वर्षांपासून ओळखत आहेत. कोरोनापूर्वी त्यांनी खरातची भेट घेतली होती. एवढेच नव्हे तर खरातने नीलम गोऱ्हेंचं भविष्य सांगितले होते, आमदारकीसाठी गोऱ्हे या खरातल्या भेटल्या असा आरोप देसाई यांनी केला आहे. कदाचित गोऱ्हे यांना खरातच्या काळ्या कारवायांची माहिती नसेल, पण आता अनेक महिलांनी खरातची गैरकृत्य सांगितल्यानंतर, गो-हे यांनी खरातविरोधात आवाज का उठवला नाही?, आपल्या भेटीची माहिती त्यांनी का दिली नाही?, असा सवालही देसाई यांनी विचारला.

मंत्रीपद मिळावें, ते भविष्य बघण्यासाठीसुद्धा कॉलेजरोडच्या खरातच्या ऑफीसमध्ये नीलम गोऱ्हे या पोहोचलेल्या होत्या. नाशिकमध्ये पाथर्डी फाट्याला एक्स्प्रेस इन नावाचे जे हॉटेल आहे, (कोरोना काळाच्या आधी) तिथे नीलम गोऱ्हे मुक्कामाला होत्या. त्यावेळी अशोक खरात हा एक्स्प्रेस इन हॉटेलमध्ये नीलम गोऱ्हे यांना त्यांचं भविष्य सांगण्यासाठी भेटायला गेलेला होता. हे प्रकरण बाहेर आल्यापासून अनेक जण या प्रकरणात बोलत नव्हते, त्यात सर्वात महत्वाचा चेहरा होता तो नीलमताई गोऱ्हेंचा.

कारण नीलम गोऱ्हेंना आपण पाहिलं आहे, अगदी छोटी प्रकरणी असली तरी त्याबद्दल प्रेस नोट काढणे, त्यावर जाहीरपणे त्या बोलत असता. पण आता अख्खे अधिवशेन झाले, तिथे त्या उपसभापती म्हणून आहेत. महिलांच्या लैंगिक शोषणा मुद्दा आला की नीलमताई या पाडितेला भेटायला जातात. पण इथे १५० हून अधिक व्हिडीओ पोलिसांकडे आले, मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणाची दखल घेतली, तेजस्वीनी सातपुते या महिला अधिकारी या प्रकरणाचा तपास करत आहेत. तरीही एक महिला नेतच्या म्हणून, जबाबदारीचं पद (विधानपरिषदेच्या उपसभापती) आहे, या खरात प्रकरणात नीलम गोऱ्हे आत्तापर्यंत काहीच बोलल्या नाहीत, ते का असा सवाल तृप्तची देसाई यांनी विचारला.

# प्रशासकीय कामात पारदर्शकता, कालमर्यादा आणि विश्वासार्हतेच्या त्रिसूत्रीवर सर्व विभागांनी काम करावे

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस । १५० दिवसांच्या ई- गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विभागांचा गौरव

● **मुंबई । वीरभूमी–**

राज्यातील नागरिकांना सर्व शासकीय सेवा आणि योजनांचा लाभ एकाच माध्यमातून मिळण्यासाठी आणि विकसित महाराष्ट्राचे ध्येय साध्य करताना प्रशासकीय कामात पारदर्शकता, कालमर्यादा आणि विश्वासार्हता या त्रिसुत्रीच्या आधारावर सर्व विभागांनी काम करावे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथिगृह येथे '१५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा' कार्यक्रमांतर्गत निवडलेली उत्कृष्ट कार्यालये व सेवाकर्मी कार्यक्रमांतर्गत निवडलेल्या उत्कृष्ट कार्यालय प्रमुखांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी माहिती तंत्रज्ञान तथा संस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पोलीस महासंचालक सदानंद दाते यांच्यासह सर्व मंत्रालय विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव सचिव यांच्यासह १५० दिवसांच्या ई- गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कार्य करणारे प्रमुख अधिकारी प्रत्यक्ष व दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्यक्रमात मार्गदर्शन करताना सांगितले की, माहिती तंत्रज्ञान विभागाने 'एक राज्य, एक पोर्टल' ही संकल्पना राबवावी. शासनाच्या अनेक वेगवेगळ्या संकेतस्थळांमुळे नागरिकांचा होणारा संभ्रम टाळण्यासाठी सर्व सेवांचे एकत्रीकरण असलेले एकच पोर्टल माहिती व तंत्रज्ञान विभाागाने तयार करावे.



सर्व शासकीय सुविधा नागरिकांना सहजरित्या उपलब्ध होण्यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागाने प्राधान्याने काम करावे.

महाआयडी प्रणालीच्या माध्यमातून नागरिकांसाठी एक विशिष्ट 'महाआयडी' तयार करण्यात येईल. आणि केवळ एका आयडीच्या आधारावर सर्व शासकीय योजनांचा लाभ घेता येईल. ज्यामुळे डेटा फिल्टर होऊन सेवांचा दुरुपयोग थांबण्यास मदत होईल. यासोबतच अनेक विभागांचे कामकाज हे बहुतेक प्रमाणात ई- ऑफीस झाले असून ते 'लो पेपर' वरून 'नो पेपर'वर नेण्यासाठी मुख्य सचिवांनी कालबद्ध कार्यक्रम निश्चित करावा, अशा सूचनाही यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिल्या.

या कार्यक्रमा दरम्यान माहिती तंत्रज्ञान विभागाने तयार केलेल्या 'महासारथी' या संकेतस्थळाचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. महासारथी संकेतस्थळाचे लोकार्पण केल्यानंतर मुख्यमंत्री म्हणाले की, हे संकेतस्थळ म्हणजे आपली डेटा बँक आहे. या संकेतस्थळाच्या माध्यमातून सर्व शासकीय डेटा एकत्रित करण्यात आला असून त्याद्वारे एकमेकांशी संवाद साधता येईल. तसेच नियोजन, अंमलबजावणी आणि देखरेखीसाठी महाराष्ट्र इंटिग्रेटेड डेटा एक्सचेंज तयार करत असून ज्यामुळे डाटा ड्रिव्हन निर्णय प्रक्रिया राबविता येणे शक्य होणार आहे.

एआय आणि प्रगत तंत्रज्ञानाच्या आधारे अहोरात्र अविरत सेवा देण्यासाठी जनरेटिव्ह एआय आणि चॅटबॉट्स, ब्लॉकचेन यांचा वापर वाढवण्यावर अधिक भर दिला जाणार आहे. या अंतर्गत कृषी विभागाने तयार केलेले 'महा-विस्तार' हे एआय प्लिकेशन देशात पथदर्शक ठरले असून, त्यात आदिवासी भाषांचाही समावेश करण्यात आला आहे. यामध्ये शेतीशी संबंधित सर्व माहिती, हवामान अंदाज याबाबत देखील माहिती उपलब्ध आहे. इतरही विभागांनी कृषी विभागाने तयार केलेल्या या महा-विस्तार एआय प्रणाली सारखे एआयचा उपयोग करून काही वेगळे करण्यायसाठी प्रयत्न करावेत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी यावेळी सांगितले.

# SPOT NEWS

## शहरात जनलोक अदालतमधून आयुष्मान भारत व वय वंदना योजनेचा जागर

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

शहरात पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जनलोक अदालतमध्ये सर्वसामान्य नागरिकांना शासकीय आरोग्य योजनांचा थेट लाभ मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना तसेच आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना अंतर्गत पात्र कुटुंबांना दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंत कॅशलेस उपचार मिळावेत, यासाठी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. याचबरोबर ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना वय वंदना योजनेअंतर्गत कॅशलेस उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यावरही विशेष भर देण्यात आला. या उपक्रमात डॉ. अनिकेत भालसिंग (जिल्हा प्रमुख), व्ही. बी. वांडेकर (दक्षता अधिकारी), हर्षवर्धन साळवे (टीम लीडर), आरोग्यमित्र धीरज उबाळे यांच्यासह अनेक आरोग्यमित्रांनी सहभाग घेत नागरिकांना योजनांचा लाभ कसा मिळवता येईल याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. केंद्र सरकारने २०२३ मध्ये मेडिएशन क्ट लागू केल्याने तसेच सर्वोच्च न्यायालयाने देशभर कम्युनिटी मेडिएशन राबविण्याचे निर्देश दिल्याने या चळवळीला नवे बळ मिळाले आहे. यापुढे शासकीय अधिकारी अशा प्रक्रियेत सहभागी होण्यास बांधील राहतील व टाळाटाळ करता येणार नाही, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी सांगितले की, गरीब व दुबळ्या घटकांना मिळणाऱ्या आरोग्य योजनांचा लाभ रेशनकार्डातील त्रुटींमुळे नाकारला जाणार नाही. लाखो लोकांना किरकोळ कारणांमुळे योजनांपासून वंचित ठेवले जात होते; मात्र यापुढे असा अन्याय सहन केला जाणार नाही. आवश्यक असल्यास राष्ट्रीय जनलोक अदालतच्या माध्यमातून अधिकाऱ्यांना जाहीरपणे जबाबदार धरले जाईल. कोरोना काळानंतर आरोग्य सेवांचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले असून नागरिकांनी वेळ येण्यापूर्वीच शासकीय योजनांची पात्रता पूर्ण करून लाभ घ्यावा, असेही त्यांनी आवाहन केले. जनलोक अदालतच्या माध्यमातून गावागावात जनजागृती करून आयुष्मान भारत व वय वंदना योजनेची माहिती पोहोचवली जाणार आहे. भारतीय संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारांवर काही अधिकारी अन्यायकारक पद्धतीने गदा आणत असल्याची टीका करत अशोक सब्बन यांनी सांगितले की, देशात कायद्याचे राज्य जनतेच्या साक्षीने राबविले गेले पाहिजे. भ्रष्टाचार व अनागोंदी करणाऱ्या अधिकाऱ्यांना उघड करण्याचा इशाराही त्यांनी दिला.जनलोक अदालतमध्ये ॲड. अमित थोरात, शाहीर कान्हु सुंबे, ॲड. लक्ष्मणराव पोकळे, वीर बहादूर प्रजापती, संतोष खामकर, ओम कदम, पोपट शेळके, धनंजय मडके, कैलास पठारे, ॲड. विद्या शिंदे, राजेंद्र कर्डिले, दिलीप घुले, प्रकाश गोसावी आदींनी सहभाग नोंदविला.

## सावेडी पोस्ट कार्यलयामध्ये स्वच्छता अभियान आणि महिला कर्मचाऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपण

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

शहरातील सावेडी परिसरातील पोस्ट कार्यालयामध्ये स्वच्छता अभियानासोबतच महिला कर्मचाऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपणाचा स्तुत्य उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या उपक्रमामुळे पर्यावरण संवर्धनासोबतच महिला सन्मानाचा संदेश दिला गेल्याने सर्वत्र कौतुक होत आहे. विशेषतः पोस्टमास्तर किशोर नेमाने यांच्या पुढाकारामुळे हा उपक्रम आदर्श ठरत असल्याची भावना व्यक्त होत आहे. कार्यक्रमाच्या प्रारंभी पोस्ट कार्यलय परिसरात स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. आवारातील कचरा साफ करून परिसर स्वच्छ करण्यात आला. त्यानंतर महिला कर्मचाऱ्यांच्या हस्ते विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. राज्य शासन 'लाडक्या बहिणी' योजनेच्या माध्यमातून महिलांना सन्मान देत असताना, केंद्र शासनाशी निगडित असलेल्या पोस्ट खात्याच्या सावेडी कार्यालयानेही महिलांना प्राधान्य देत त्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून एक नवा पायंडा पाडत आदर्श निर्माण केला आहे. सावेडी उपनगरातील पोस्ट कार्यालय नुकतेच अद्ययावत करण्यात आले असून, आधुनिक सुविधांमुळे नागरिकांचा पोस्ट सेवांवर विश्वास अधिक दृढ झाला आहे. पैसे भरणे, बचत खाते व्यवहार तसेच विविध आर्थिक सेवांसाठी नागरिकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ येथे पाहायला मिळते. अशा परिस्थितीत सामाजिक उपक्रम हाती घेतल्याने सावेडी पोस्ट कार्यालयाचे महत्त्व अधिक वाढले असून सर्व स्तरातून कौतुक होत आहे. या उपक्रमात पोस्ट मास्तर किशोर नेमाने, पोस्टमन शुभम गायके, प्रदीप हिंगे, तनुजा सोनवणे, अनुष्का वालझाडे, उमेश सोनवणे, राहुल साबळे, भाऊराव शेलार, अजिंक्य खराड, अक्षय अजबे, अशोक लाळगे, बाळासाहेब गाडे, आजिनाथ खेडकर, हरीश गांगुर्डे, रियाज सय्यद, सलीम सय्यद, सचिन जाधव, एमटीएस जावेद शेख, पल्लवी हदगळ मॅडम तसेच इलियाज शेख यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमात पोस्ट मास्तर किशोर नेमाने यांनी आपल्या भाषणात सांगितले की, स्वच्छता ही केवळ मोहीम नसून ती प्रत्येकाची जबाबदारी आहे. आपण ज्या ठिकाणी काम करतो तो परिसर स्वच्छ व सुंदर ठेवणे हे आपले कर्तव्य आहे. आज महिला कर्मचाऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून आम्ही महिला सन्मानाचा संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे.

# वाढवण बंदरात १२०० एकरावर आंतरराष्ट्रीय कृषी बाजारपेठ उभारणार !

### कोपरगाव येथे पणन मंत्री जयकुमार रावल यांची माहिती | राज्यातील १९० बाजार समित्यांमध्ये 'शेतकरी भवन'

**● कोपरगाव । वीरभूमी –**

शेतकरी हा केवळ अन्नदाता नसून तो देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेतकऱ्याला सक्षम केल्यावरच राज्याची ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होईल. याच दृष्टिकोनातून राज्यातील ३०६ पैकी जवळपास १९० कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांच्या निवाऱ्यासाठी सर्व सोयीसुविधांनी युक्त असे 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन' उभारण्यात येत आहे. तसेच, शेतमालाला जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी वाढवण बंदर परिसरात तब्बल १२०० एकर जागेवर पॅरिसच्या धर्तीवर जगातील सर्वात मोठी आंतरराष्ट्रीय कृषी बाजारपेठ उभारण्याचा महत्त्वाकांक्षी संकल्प शासनाने केला असल्याची माहिती पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी आज येथे दिली.



कोपरगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवनाचे भूमिपूजन व विविध विकासकामांच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी माजी आमदार स्नेहलता कोल्हे, संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे, सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन विवेक कोल्हे, कोपरगावचे नगराध्यक्ष पराग संधान, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती साहेबराव रोहोम आदी उपस्थित होते.

श्री. रावल म्हणाले, राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. शेतकऱ्यांना शेतीसाठी मोफत वीज देण्याच्या उद्देशाने सौर कृषिपंप योजनेची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे. शेतकरी सन्मान योजनेअंतर्गत केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना वार्षिक बारा हजार रुपयांची आर्थिक मदत दिली जात आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना पन्नास हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान दिले जात असून सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांचा शेतमाल हमीभावाने खरेदी करून शासनाने त्यांना मोठा दिलासा दिला आहे. यासोबतच महिलांच्या सक्षमीकरणासाठी 'लाडकी बहीण' योजना प्रभावीपणे राबविली जात आहे.

शेतीमालाच्या विक्रीत आधुनिकता आणण्यासाठी 'राष्ट्रीय कृषी बाजार' (ई-नाम) प्रणालीचा वापर वाढविला जात आहे. 'एक देश, एक बाजारपेठ' या संकल्पनेनुसार राज्यात 'एकत्रित परवाना' व्यवस्था लागू केली जात आहे, जेणेकरून राज्यातील कोणत्याही बाजार समितीतून शेतमालाची खरेदी करणे व्यापाऱ्यांना शक्य होईल. आशियाई विकास बँकेच्या सहकार्याने २१०० कोटी रुपयांचा 'मॅग्नेट २.०' हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. यातून शेतमालावर प्राथमिक प्रक्रिया, मालवाहतूक व साठवणूक प्रकल्पांसाठी विशेष अनुदान उपलब्ध करून दिले जाणार आहे, असेही श्री. रावल यांनी सांगितले.

श्री. रावल पुढे म्हणाले, कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी शासनाने विशेष कृती आराखडा तयार केला आहे. या अंतर्गत राज्यात 'कांदा महाबँक' उभारण्यात येणार असून समृद्धी महामार्गावर पाच ठिकाणी 'कांदा बँक' निर्माण केल्या जातील. या माध्यमातून कांद्याची साठवणूक, वर्गीकरण, वेष्टन व मूल्यवर्धन करण्यावर भर दिला जाणार आहे. कांदा उत्पादकांना योग्य भाव मिळावा व त्यांचे नुकसान टळावे, यासाठी शासनाने नियुक्त केलेल्या उच्चस्तरीय समितीमार्फत तातडीने उपाययोजना केल्या जात आहेत.

कोपरगाव कृषी उत्पन्न बाजार समितीने सहकार व विकासाचा मोठा वारसा अत्यंत चांगल्या पद्धतीने जपला आहे. बाजार समितीच्या वाढत्या उलाढालीची दखल घेत भविष्यात येथे शीतगृह, साठवणूक गोदामे व शेतमाल प्रतवारी यंत्रणा उभारण्यासाठी शासनाकडून आवश्यक ते सहकार्य केले जाईल. भौगोलिक मानांकन प्राप्त शेतमालाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळवून देण्यासाठी परदेशांसोबत व्यापार करार केले जाणार आहेत. येथील शेतकरी भवनाचे काम लवकरच पूर्ण होईल व भविष्यातील सर्व योजनांमध्ये कोपरगाव बाजार समितीला प्राधान्य दिले जाईल, अशी ग्वाही त्यांनी याप्रसंगी दिली.

यावेळी स्नेहलता कोल्हे, बिपीन कोल्हे व विवेक कोल्हे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कोपरगाव बाजार समितीच्या शेतकरी भवनासाठी १ कोटी ७३ लाख रुपयांचा निधी शासनाने उपलब्ध करून दिल्याचे साहेबराव रोहोम यांनी प्रास्ताविकात सांगितले.

## ग्लोबस सेंटर ते कराळे हेल्थ क्लबकडे जाणाऱ्या रस्त्याचे डांबरीकरण करा

### परिसरातील नागरीकांची मनपाकडे मागणी

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

येथील अहिल्यानगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. ७ मधील ग्लोबस सेंटर ते जिल्हा कृषी अधिकारी कार्यालय ते कराळे हेल्थ क्लबकडे जाणारा रस्ता अत्यंत खराब झालेला असून रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडलेले आहेत. या परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात एम.आय.डी.सी. मध्ये काम करणारा वर्ग मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे या परिसरातील नागरिकांना रस्त्याने ये-जा करणे मुश्किल झालेले आहे.

सदरील रस्त्याचा वापर बालिकाश्रम रोडने बोल्हेगाव, एम.आय.डी.सी. परिसरामध्ये दैनंदिन कामकाजासाठी होतो. सदरील रस्त्याचे डांबरीकरण व सुशोभिकरण करणेबाबत या परिसरातील नागरिकांनी माझेकडे वेळोवेळी मागणी केली आहे. सदरील परिसरातील नागरिकांची समस्या लक्षात घेता या रस्त्याचे डांबरीकरण करणे व सुशोभिकरण करणे अत्यंत गरजेचे आहे.

तरी प्रभाग क्र ७ मधील ग्लोबस सेंटर ते जिल्हा कृषी अधिकारी कार्यालय ते कराळे हेल्थ क्लबकडे जाणा-या रस्त्याचे डांबरीकरण करणे व सुशोभिकरण करणेबाबत संबंधितांना योग्य ते आदेश देण्यात यावेत, ही विनंती. लवकरात लवकर डांबरीकरणाचे काम पूर्ण न झाल्यास प्रभागातील नागरिकांतर्फे रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल.

## बडेवाडी येथे उद्यापासून श्रीक्षेत्र भगवानगडाचा नारळी सप्ताह

**● पाथर्डी । वीरभूमी–**

श्री संत भगवानबाबांनी प्रारंभ केलेल्या नारळी सप्ताहाच्या ९२ व्या वर्षीचे यजमानपदाचे शिवधनुष्य हे बडेवाडी ग्रामस्थांनी उचलले आहे. श्रीक्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती, ह.भ.प. महंत न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली सप्ताहाची तयारी अंतीम टप्प्यात आली असुन मंडप उभारणीचे काम पूर्ण झाले आहे. श्री संत भगवानबाबांनी फिरता नारळी सप्ताहाचा नाविन्यपुर्ण उपक्रम ९२ वर्षांपूर्वी श्रीक्षेत्र नारायणगडाच्या पायथ्याशी असलेल्या पखालडोह या ठिकाणी सुरू केला. त्यांचे पश्चात तीच सप्ताहाची परंपरा श्रीक्षेत्र भगवानगडाचे द्वितीय उत्तराधिकारी अष्टपैलू संत, वै.ह.भ.प.गुरुवर्य श्री संत भिमसिह महाराज यांनी सुरू ठेवत बाबांचे कार्य सुरू ठेवले होते. वै.गुरुवर्य भीमसिंह महाराजांच्या वैकुंठगमनानंतर श्री क्षेत्र भगवानगडाचे तृतीय उत्तराधिकारी तथा विद्यमान मठाधिपती न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली या सप्ताहाची एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे. हा नारळी सप्ताह वैभवशाली असल्याने संपूर्ण महाराष्ट्रातून लाखो भाविक सप्ताहामध्ये आठवडाभर उपस्थित असतात. नारळाचे यजमानपद स्विकारलेले ग्रामस्थ आठवडाभर तन, मन आणि धन खर्ची घालत श्रीगुरूंची सेवा करत असतात.



३१ मार्च रोजी हा महोत्सव प्रारंभ होत असुन सप्ताहामध्ये ह.भ.प. महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली भागवताचार्य ह.भ.प. प्रकाश महाराज साठे यांच्या अमृततुल्य वाणीतून ७ दिवस भव्य श्रीमद् भागवत कथा निरूपण सोहळा होणार आहे. सप्ताहामध्ये ह.भ.प. रामगिरी महाराज (येळेश्वर संस्थान येळी), भागवताचार्य तुकाराम महाराज मुंडे शास्त्री, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज जळकीकर, ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर, ह.भ.प. प्रभाकर महाराज बोधले पंढरपूरकर, श्रीक्षेत्र भगवानगडाचे उत्तराधिकारी ह.भ.प. कृष्णा महाराज शास्त्री यांच्या कीर्तन सेवा होणार असून सप्ताहाच्या सातव्या दिवशी रात्री ठीक ८:३० ते ११ या वेळेत श्रीक्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांचे जागराचे हरीकीर्तन तर दुसऱ्या दिवशी सकाळी काल्याचे किर्तन होणार आहे. त्यानंतर महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होईल. सप्ताहामध्ये दररोज पहाटे काकडा भजन, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, हरिपाठ इ. धार्मिक कार्यक्रमही होतील. यंदा उष्णता जास्त असल्यामुळे भाविकांना कीर्तन ऐकताना उकाड्यापासून मुक्तता मिळावी म्हणून सप्ताहातील सर्व कीर्तनं मोकळ्या जागेत होणार आहेत. तर दिवसभरातील कार्यक्रमासाठी भव्य मंडपाची उभारणी केलेली आहे.

## अशांततेच्या पार्श्वभूमीवर पाथर्डी येथे विश्वशांतीसाठी सामूहिक शांती जाप

**● पाथर्डी । वीरभूमी–**

सध्या जगभरात निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थिती व वाढत्या अशांततेच्या पार्श्वभूमीवर पाथर्डी येथील जैन स्थानकात विश्वशांतीसाठी विशेष धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. जैन साध्वी महासती श्री जयश्री जी महाराज साहेब आदी ठाणा तीन यांच्या पावन उपस्थितीत महावीर जयंतीनिमित्त महामंगलकारी पैसष्ठिया मंत्राचा सामूहिक शांती जाप मोठ्या श्रद्धा व भक्तिभावाने संपन्न झाला.

यावेळी श्रावक संघाचे अध्यक्ष सुभाष चोरडिया, सुरेश गुगळे, सुरेश कुचेरिया, सतिश गुगळे, सुभाषलाल खाबिया, राजेंद्र मुथ्था, महेंद्र गुगळे, अमित गुंदेचा, स्वप्नील गुगळे, अनिल खाटेर, सचिन चोरडिया, प्रितम गुगळे, आनंद लुनावत, अल्पेश भंडारी, परेश पटवा, आदींसह जैन समाजातील शेकडो अनुयायांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मंत्रजपात सहभाग घेतला. संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. उपस्थितांनी एकसुरात केलेल्या मंत्रोच्चारामुळे वातावरणात सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली असून, विश्वशांतीचा संदेश दिला गेला.

यावेळी मार्गदर्शन करताना महासती जयश्रीजी महाराज म्हणाल्या की, आज जगातील अनेक देशांमध्ये युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्याने मानवजातीसमोर गंभीर संकट उभे ठाकले आहे. या संघर्षामुळे हजारो निष्पाप नागरिकांचे जीव जात आहेत, तर लाखो लोक भयभीत अवस्थेत जीवन जगत आहेत. अशा भीषण परिस्थितीत प्रत्येकाने आपल्या परीने शांतीसाठी प्रयत्न करणे आवश्यक असून, प्रार्थना ही त्यासाठी प्रभावी माध्यम ठरते.

त्या पुढे म्हणाल्या की, परमेश्वराकडे मनोभावे केलेली प्रार्थना कधीही व्यर्थ जात नाही. सामूहिक प्रार्थनेला विशेष महत्त्व असून ती अधिक परिणामकारक ठरते. हे परमेश्वरा, सर्वांना सद्बुद्धी दे, जगातील संघर्ष समाप्त कर, सर्वत्र शांतता प्रस्थापित कर, प्रत्येकाच्या जीवनात सुख-समाधान निर्माण कर आणि सर्वांना भयमुक्त कर, अशी भावनिक प्रार्थना यावेळी करण्यात आली.



यावेळी देशाच्या सुरक्षिततेसाठीही विशेष प्रार्थना करण्यात आली. आपल्या देशावर कोणतेही संकट येऊ नये, नागरिक सुखी व सुरक्षित राहावेत, अशी सामूहिक भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

हा कार्यक्रम केवळ धार्मिक न राहता सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देणारा ठरला. अशा उपक्रमांमधून समाजात ऐक्य, सद्भावना आणि शांततेचा संदेश रुजविण्याचे महत्त्व अधोरेखित झाले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# पारनेरमध्ये वन्यजीवांना 'घोटभर पाणी' उपक्रमातून माणुसकीचे दर्शन

### पारनेर जवळील सिद्धेश्वरवाडी रोड परिसरातील वनविभागाच्या पाणवठ्यांमध्ये वन्यजीवांसाठी सोडले पाणी

**● पारनेर । वीरभूमी–**

वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे निसर्ग होरपळून निघत असताना, मुक्या प्राण्यांच्या तृष्णेचा विचार करून पारनेरमध्ये एक स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला आहे. पारनेर जवळील सिद्धेश्वरवाडी रोड परिसरातील वनविभागाच्या पाणवठ्यांमध्ये वन्यजीवांसाठी पाणी सोडण्यात आले. पारनेर तालुका पत्रकार संघाच्या वन्यजीवांसाठी घोटभर पाणी या सामाजिक उपक्रमांतर्गत आणि नगरसेवक अशोक चेडे यांच्या संवेदनशील पुढाकारातून हा मदतीचा ओघ सुरू झाला आहे.

वातावरणातील उष्णता वाढल्याने नैसर्गिक पाण्याचे स्रोत आटले आहेत. अशा स्थितीत हरिण, मोर, लांडोर यांसारख्या वन्यजीवांना पाण्यासाठी वणवण भटकंती करावी लागते. हीच गरज ओळखून नगरसेवक अशोक चेडे यांच्या आर्थिक सहकार्यातून या पाणवठ्यांमध्ये मुबलक पाणी उपलब्ध करून देण्यात आले. यावेळी बोलताना चेडे म्हणाले की, वाढत्या तापमानामुळे निसर्गातील पाण्याचे स्रोत कमी होत आहेत. अशावेळी केवळ प्रशासनावर विसंबून न राहता समाजातील दानशूर व्यक्तींनी पुढे येणे काळाची गरज आहे. येत्या दोन महिन्यांत प्राण्यांना पाणी कमी पडू नये, यासाठी मी वचनबद्ध असून खराब झालेले पाणवठ्यातील लिकेजही तातडीने दुरुस्त करून दिले जातील.

या प्रसंगी उपस्थित असलेल्या आदर्श शिक्षिका मीरा पुजारी यांनी पत्रकार संघाच्या या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. त्या म्हणाल्या, या परिसरात हरणांचे मोठे कळप वास्तव्यास आहेत. पाण्यासाठी त्यांची भटकंती थांबणार असल्याने हा उपक्रम खऱ्या अर्थाने जीवनदायी ठरेल. पत्रकारांनी केवळ लेखणी न चालवता सामाजिक बांधिलकी जोपासावी,

> निसर्गाचा समतोल राखण्यासाठी वन्यजीवांचे रक्षण करणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. पारनेर तालुका पत्रकार संघाने सुरू केलेला हा 'घोटभर पाण्याचा' यज्ञ येणाऱ्या काळात इतर संस्थांसाठीही दीपस्तंभ ठरेल.
>
> **– भगवान गायकवाड,**
> स्नेहालय संस्था, उडान प्रकल्प

हे या उपक्रमातून सिद्ध झाले आहे. यावेळी कार्यक्षम नगरसेवक अशोक चेडे, आदर्श शिक्षिका मीरा पुजारी, शिक्षक अजिनाथ ढेरे, सामाजिक कार्यकर्ते किरण सोनवणे, सुनील चौधरी संचालक, सनराईज अकॅडमीच सुनिल चौधरी, सामाजिक कार्यकर्ते भगवान गायकवाड आदींनी मनोगत व्यक्त केले.



वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

## निमगाव वाघा येथे हरिनाम सप्ताहाची काल्याच्या कीर्तनाने सांगता

**• अहिल्यानगर । वीरभूमी–**

नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे श्रीराम नवमीनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची यंदाही भक्तिमय वातावरणात सांगता झाली. या सप्ताहाचे हे सलग ३९ वे वर्ष असून, गावासह पंचक्रोशीतील भाविक या धार्मिक सोहळ्याने भक्तीरसात न्हाऊन निघाले. संपूर्ण सप्ताहभर हरिनामाचा गजर, भजन–कीर्तन आणि ज्ञानेश्वरी पारायणाने गावातील वातावरण भक्तीमय बनले होते. या सोहळ्याची सांगता ह.भ.प. श्रीनिवास महाराज घुगे यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. त्यांच्या प्रभावी वाणीने आणि रसाळ कथनशैलीने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. कीर्तनात घुगे महाराजांनी भगवान श्रीकृष्णाच्या जीवनातील विविध प्रसंगांचे अत्यंत समर्पक वर्णन केले. ते म्हणाले, भगवान श्रीकृष्णाचे चरित्र हे केवळ कथा नसून जीवन जगण्याची दिशा देणारे आहे. त्यांनी संकटांवर मात करत धर्म, सत्य आणि कर्तव्य यांचा मार्ग दाखविला. प्रत्येक व्यक्तीने आपल्या जीवनात श्रीकृष्णाच्या तत्वांचा स्वीकार केल्यास समाजात सद्भावना आणि शांतता निर्माण होईल. ते पुढे म्हणाले, आजच्या धावपळीच्या जीवनात भक्ती, नामस्मरण आणि संतसाहित्य यांचे महत्त्व अधिक वाढले आहे. हरिनाम सप्ताहासारख्या उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते आणि नवीन पिढीला संस्कारांचा वारसा मिळतो. कीर्तनानंतर घुगे महाराजांच्या हस्ते पारंपरिक पद्धतीने दहीहंडी फोडण्यात आली. या प्रसंगी उपस्थित भाविकांनी टाळ्या वाजवत आणि जयघोष करत उत्साह व्यक्त केला. वातावरणात गोविंदा गोपाळा चा निनाद घुमला. या कार्यक्रमाला माधवराव लामखडे, उद्योजक बाळासाहेब शहाणे, साहेबराव बोडखे, सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे, भागचंद जाधव, काशीनाथ पळसकर, प्रशांत जाधव, भरत बोडखे, प्रमोद जाधव, बापू फलके, भानुदास ठोकळ, नवनाथ जाधव, बापू सुंबे, उत्तम कांडेकर, ह.भ.प. विठ्ठल महाराज खळदकर, डॉ. विजय जाधव, अतुल फलके, संदीप येणारे, पिंटू जाधव, चंद्रकांत पवार आदींसह मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता महाप्रसादाने करण्यात आली. पंचक्रोशीतील भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. या सप्ताहाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी नाथयोगी परिवारातील युवकांनी परिश्रम घेतले. त्यांच्या नियोजनबद्ध कार्यामुळे कार्यक्रम सुरळीतपणे पार पडला.

## मेरा युवा भारतच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांनी न्यू आर्ट्स महाविद्यालय गाजले

**• अहिल्यानगर । वीरभूमी –**

युवा कार्यक्रम एवं खेल मंत्रालयाच्या मेरा युवा भारत अहिल्यानगरच्या वतीने न्यू आर्ट्स, कॉमर्स व सायन्स महाविद्यालयात जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडल्या. कबड्डी, खो–खो, व्हॉलीबॉल या सांघिक खेळांसोबतच गोळा फेक आणि धावणे या वैयक्तिक स्पर्धांनीही रंगत आणली. अत्यंत चुरशीच्या लढतींमुळे संपूर्ण परिसरात क्रीडामय वातावरण निर्माण झाले होते. महाविद्यालयाच्या जिमखाना मैदानावर खेळाडूंची लगबग पाहायला मिळाली. स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे उपप्राचार्य अनिल आठरे यांच्या हस्ते झाले. यावेळी मेरा युवा भारतचे सत्यजीत संतोष, जिमखाना चेअरमन अनंत पंडित, शरद मगर, धन्यकुमार हराळ, रमेश गाडगे, श्रीकृष्ण मुरकुटे आदी मान्यवरांसह मोठ्या संख्येने विद्यार्थी व खेळाडू उपस्थित होते. प्रास्ताविकात शरद मगर यांनी सांघिक खेळांसोबत वैयक्तिक स्पर्धांचेही आयोजन महत्त्वाचे असल्याचे सांगितले. शासकीय स्पर्धांमध्ये सहभाग घेतल्यास खेळाडूंच्या करिअरला चालना मिळते, असे त्यांनी नमूद केले. न्यू आर्ट्स महाविद्यालयातून अनेक दिग्गज खेळाडू घडले असून त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर नाव कमावले आहे. विशेषत: कबड्डी संघाने राष्ट्रीय स्तरावर यश संपादन केल्याचेही त्यांनी सांगितले.उपप्राचार्य अनिल आठरे यांनी आपल्या भाषणात खेळाडूंच्या फिटनेसचे महत्त्व अधोरेखित केले. चांगले आरोग्य असेल तरच खेळाडू आपल्या क्षेत्रात यशस्वी होऊ शकतात. शरीर हीच खरी संपत्ती आहे, त्यामुळे प्रत्येकाने फिटनेसकडे लक्ष देणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले. सत्यजीत संतोष म्हणाले की, मेरा युवा भारत हा उपक्रम केवळ क्रीडा स्पर्धांपुरता मर्यादित नसून, तरुणांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत आहे. आजच्या स्पर्धांमधून खेळाडूंमध्ये असलेली ऊर्जा, जिद्द आणि स्पर्धात्मक वृत्ती स्पष्टपणे दिसून येते. ग्रामीण भागातील खेळाडूंना योग्य व्यासपीठ मिळाल्यास तेही राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवू शकतात, यावर आमचा विश्वास आहे. क्रीडा क्षेत्र हे केवळ शारीरिक ताकदीचे नसून मानसिक स्थैर्य, शिस्त आणि टीमवर्क शिकवणारे माध्यम आहे. अशा स्पर्धांमधून खेळाडूंमध्ये आत्मविश्वास वाढतो. पुढील काळात अधिक मोठ्या प्रमाणावर स्पर्धा आयोजित करून अधिकाधिक युवकांना संधी देण्याचा आमचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले. संपूर्ण स्पर्धा उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडल्या. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी न्यू आर्ट्स, कॉमर्स व सायन्स महाविद्यालयाच्या जिमखाना विभागाचे विशेष सहकार्य लाभले.

# अंधारलेल्या आयुष्यांना आनंदऋषी नेत्रालयाकडून जीवनात प्रकाश

### सुरेंद्र लोढा । आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या नेत्र तपासणी शिबिरात ४४५ रुग्णांची मोफत तपासणी

**• अहिल्यानगर । वीरभूमी –**

व्याधीने ग्रासलेल्या दीन–दुबळ्या रुग्णांना नवजीवन देण्याचे आणि नेत्र विभागाच्या माध्यमातून त्यांच्या जीवनातील अंधकार दूर करण्याचे कार्य आनंदऋषीजी हॉस्पिटल करत आहे. अंधारलेल्या आयुष्यांना, जीवनात प्रकाश निर्माण होत असून, या हॉस्पिटलची आरोग्यसेवा रुग्णांसाठी खऱ्या अर्थाने संजीवनी ठरत असून, ग्रामीण भागातील रुग्णांसाठी हे आरोग्यसेवेचे मंदिरच आधार ठरले आहे, असे प्रतिपादन सुरेंद्र लोढा यांनी केले.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषिजी म.सा. यांच्या ३४ व्या स्मृतिदिनानिमित्त, लोढा परिवाराच्या वतीने आयोजित मोफत नेत्ररोग तपासणी शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी सविता लोढा, सुजाता लोढा, हेमा लोढा, मनिषा लोढा, देव लोढा, शोभा लोढा, अनिता लोढा, संजना लोढा, स्मिता लोढा, संतोष बोथरा, डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. वसंत कटारिया, माणकचंद कटारिया, डॉ. आशिष भंडारी, नेत्रालय विभागाचे प्रशासकीय अधिकारी आनंद छाजेड, प्रकाश छल्लाणी, सुभाष मुनोत, वसंत चोपडा, नेत्र तज्ञ डॉ. अशोक महाडिक, डॉ. संदिप राणे, डॉ. प्रतिक कटारिया, डॉ. किरण शिंदे, डॉ.



ऋषीकेश ठेरले आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात डॉ. प्रकाश कांकरिया म्हणाले की, आनंदऋषीजी हॉस्पिटलचा नेत्रालय विभाग अंधारलेल्या व्यक्तींच्या जीवनात प्रकाश आणण्याचे कार्य सातत्याने करत आहे. सुसज्ज नेत्र विभाग व तज्ञ डॉक्टरांच्या माध्यमातून दररोज शंभरपेक्षा जास्त डोळ्यांच्या शस्त्रक्रिया होत आहेत. या नेत्रालयाने राज्यभरात रुग्णांचा मोठा विश्वास संपादन केला असून, मराठवाडा भागातील गरजू रुग्ण मोठ्या प्रमाणात लाभ घेत आहेत. महाराष्ट्रातील ५ जिल्ह्यांत नेत्रालय विभागाची २२ व्हिजन सेंटर कार्यरत असून ग्रामीण भागात दारोदारी सेवा पोहोचवली जात आहे. तारकपूर येथे नव्याने नेत्र विभाग कार्यान्वित करण्यात आला असून पुढील टप्प्यात आय बँक सुरू करण्याचे स्वप्न साकार करण्यात येणार आहे. नेत्रदानाच्या माध्यमातून अनेकांचे अंधत्व दूर करण्यासाठी हॉस्पिटल प्रयत्नशील आहे, असे त्यांनी सांगितले. या कार्यात लोढा परिवाराचे मोलाचे योगदान लाभत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

डॉ. वसंत कटारिया यांनी लोढा परिवाराची माहिती देताना सांगितले की, आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या सेवा कार्यात हा परिवार सक्रियपणे सहभागी झाला आहे. निखील लोढा जबाबदारीने व मनापासून काम करत असून, हा परिवार सेवाभावी व धार्मिक वृत्तीचा आहे. त्यांच्या योगदानामुळे नेत्र विभागाला अल्पावधीत मोठे यश मिळाले आहे.

संतोष बोथरा म्हणाले की, ग्रामीण भागातील दृष्टीदोष असलेल्या रुग्णांच्या वाडी–वस्तीवर जाऊन त्यांना हॉस्पिटलमध्ये आणणे, शस्त्रक्रिया करून पुन्हा घरी सोडणे, असे कार्य सातत्याने केले जात आहे. हे कार्य एका मिशनप्रमाणे राबविले जात असून, राज्यात अग्रेसर असलेल्या संस्थांमध्ये आनंदऋषीजी हॉस्पिटलचा समावेश होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. प्रतिक कटारिया यांनी सांगितले की, तारकपूर येथे सुसज्ज नेत्र विभाग सुरू करण्यात आला असून, उपनगरातील नागरिक तसेच बाहेरून येणाऱ्या रुग्णांची सोय करण्यात आली आहे. या विभागात अवघ्या पाच महिन्यांत ५ हजारांहून अधिक रुग्णांनी उपचार घेतले असल्याची माहिती त्यांनी दिली. संजना लोढा यांनी डॉक्टर, कर्मचारी व सर्व विश्वस्तांच्या सेवाभावी कार्यामुळे हे आरोग्य मंदिर उभे राहिले असल्याचे सांगत सर्वांचे आभार मानले.

या शिबिरात एकूण ४४५ रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. यामधील गरजू रुग्णांवर अल्पदरात मोतीबिंदू, काचबिंदू आदी नेत्रदोषांवरील शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रकाश छल्लाणी यांनी मानले.

## मेरा युवा भारततर्फे जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात

### युवक-युवतींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सांघिक व वैयक्तिक बक्षिसे पटकाविली

**• अहिल्यानगर । वीरभूमी–**

युवा कार्यक्रम एवं खेल मंत्रालयाच्या मेरा युवा भारत या उपक्रमांतर्गत अहिल्यानगर येथे जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले. शहरातील न्यू आर्ट्स, कॉमर्स व सायन्स महाविद्यालयाच्या जिमखाना मैदानावर या स्पर्धा पार पडल्या. विविध क्रीडा प्रकारांमध्ये युवक–युवतींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सांघिक व वैयक्तिक स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करत बक्षिसे पटकावली.

स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभास मेरा युवा भारतचे जिल्हा युवा अधिकारी सत्यजीत संतोष, महाविद्यालयाचे उपप्राचार्य अनिल आठरे, जिमखाना चेअरमन अनंत पंडित, तसेच शरद मगर, धन्यकुमार हराळ, रमेश गाडगे, श्रीकृष्ण मुरकुटे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी व खेळाडू उपस्थित होते.



उपप्राचार्य अनिल आठरे म्हणाले की, आजच्या या क्रीडा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांमधील उर्जा, आत्मविश्वास आणि संघभावना स्पष्टपणे दिसून येत आहे. शिक्षणाबरोबरच क्रीडा हे व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे माध्यम आहे. खेळामुळे शारीरिक तंदुरुस्ती तर वाढतेच, पण मानसिक बळ, निर्णयक्षमता आणि नेतृत्वगुणही विकसित होतात. प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एक तरी खेळ आत्मसात केला पाहिजे. या स्पर्धा केवळ जिंकण्यासाठी नसून, सहभागातून शिकण्यासाठी आणि स्वतःला घडवण्यासाठी असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हा युवा अधिकारी सत्यजीत संतोष म्हणाले की, मेरा युवा भारत या उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे देशातील युवकांना सकारात्मक दिशेने प्रवृत्त करणे आणि त्यांच्या अंगभूत गुणांना वाव देणे. क्रीडा हे त्यासाठी अत्यंत प्रभावी साधन आहे. ग्रामीण व शहरी भागातील युवकांना एकत्र आणून त्यांना समान संधी देणे हे आमचे ध्येय आहे. खेळातून केवळ शरीरच नव्हे तर मन आणि विचारही मजबूत होतात. त्यामुळे युवकांनी मोबाईल व सोशल मीडियापेक्षा खेळाच्या मैदानाकडे अधिक लक्ष देण्याचे त्यांनी आवाहन केले.

वैयक्तिक स्पर्धांचे निकाल: १०० मीटर धावणे (मुली) : प्रथम– रजनी मिश्रा, द्वितीय– आरती जवरे, तृतीय– रूपाली दानवे. २०० मीटर धावणे (मुले) : प्रथम– साहिल खाटेकर, द्वितीय– महेश माळी, तृतीय– आदित्य माळी. गोळा फेक (मुली) : प्रथम– ऋतुजा जवरे, द्वितीय– पल्लवी रोकडे, तृतीय– रिया शर्मा

गोळा फेक (मुले) : प्रथम– ओम टकले, द्वितीय– प्रतीक परभणे, तृतीय– तुषार आजबे. सांघिक स्पर्धांचे निकाल: खो–खो : प्रथम– रिया शर्मा व संघ (ग्रुप), द्वितीय– सोनाली नायका (बी ग्रुप). व्हॉलीबॉल : प्रथम– छत्रपती ग्रुप, द्वितीय– वीरेंद्र क्लब. कबड्डी : प्रथम– सहयोग क्रीडा मंडळ, द्वितीय– वाडिया पार्क. या स्पर्धांच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाच्या जिमखाना विभागाचे विशेष सहकार्य लाभले.

## पाथर्डीत 'जीवनज्योत'कडून उद्या महारक्तदान शिबिर

**• पाथर्डी । वीरभूमी–**

समाजातील गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे आणि रक्तदानाबाबत जनजागृती वाढावी या उदात्त हेतूने 'जीवनज्योत रक्तदान चळवळ' अंतर्गत महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शहीद दिन आणि भगवान महावीर जयंतीच्या निमित्ताने आयोजित या उपक्रमातून समाजाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा सामूहिक प्रयत्न करण्यात येत आहे.

हे महारक्तदान शिबिर दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत पाथर्डी येथील श्री तिलोक जैन विद्यालय येथे पार पडणार आहे. तुमचे एक रक्तदान, कोणाचेही संपूर्ण आयुष्य वाचवू शकते! हा प्रेरणादायी संदेश देत नागरिकांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या शिबिराचे आयोजन माजी विद्यार्थी संघ, श्री तिलोक जैन विद्यालय, साई सेवा प्रतिष्ठान, सुवर्णयुग तरुण मंडळ, भारतीय जैन संघटना तसेच सर्व प्राथमिक शिक्षक संघटना, पाथर्डी यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. विविध सामाजिक संस्थांच्या सहभागामुळे या उपक्रमाला व्यापक स्वरूप प्राप्त झाले असून, रक्तदानासारख्या महत्त्वपूर्ण सामाजिक कार्यात नागरिकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान मानले जाते. एका रक्तदात्यामुळे अनेक रुग्णांना जीवनदान मिळू शकते. त्यामुळे नागरिकांनी भीती आणि गैरसमज दूर करून या शिबिरात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. समाजहिताच्या दृष्टीने अशा उपक्रमांचे महत्त्व लक्षात घेता, पाथर्डीकरांनी या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद देण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## कोयटे विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन व बाल आनंद मेळावा उत्साहात

**• कोपरगाव । वीरभूमी–**

समता नागरी सहकारी पतसंस्था संचलित स्व. दादाप्पा खंडाप्पा कोयटे विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन व बाल आनंद मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. शैक्षणिक, सांस्कृतिक व व्यावहारिक ज्ञान यांचा संगम या उपक्रमातून अनुभवायला मिळाला. पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली होती.

या कार्यक्रमास कोपरगाव नगरपालिका विद्यमान नगरसेविका सौ. गौरी पहाडे, सौ. सोनाली कपिले, माजी नगरसेवक मंदार पहाडे तसेच सामाजिक कार्यकर्ते संदीप कपिले, समता इंटरनॅशनल स्कूल कार्यकारी विश्वस्त सौ. स्वाती कोयटे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. समता परिवाराचे सर्वेसर्वा ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम पार पडला. शालेय व्यवस्थापन समिती प्रमुख सौ. सुहासिनी कोयटे यांनी प्रास्ताविक करत वार्षिक अहवाल सादर केला.

यावेळी स्वाती कोयटे यांनी मनोगत व्यक्त करत सांगितले की, सौ. सुहासिनी कोयटे या गेल्या २७ वर्षांपासून सासरे दादाप्पा खंडाप्पा कोयटे यांच्या नावाने शाळा सुरू करून अनेक विद्यार्थी घडवत आहेत. विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम त्या कोयटे विद्यालयात सातत्याने राबवित असून त्यामुळे हे विद्यालय विद्यार्थी केंद्रित शाळा म्हणून शहरात ओळखले जाते. कोयटे विद्यालयाच्या प्रगतीसाठी कोयटे परिवाराचेही त्यांना नेहमी सहकार्य लाभत असते.

वार्षिक स्नेहसंमेलनातून विद्यालयातील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, तामिळनाडू आणि पंजाब या राज्यांच्या संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या गीतांवर आकर्षक सादरीकरण करून प्रेक्षकांची मने जिंकली. तसेच बाल आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांनी आपल्या विविध कला गुणांना वाव देत आर्थिक व्यवहाराचे प्राथमिक धडे ही आत्मसात केले.

यावेळी माजी नगरसेवक मंदार पहाडे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, गेल्या २७ वर्षांपासून निवारा परिसर व आजूबाजूच्या भागातील विद्यार्थ्यांना कोयटे विद्यालयात गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जात आहे. सर्वसामान्य



कुटुंबातील मुलांना अल्प शुल्कात शिक्षण देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य कोयटे परिवार करत असून, परिसरात शैक्षणिक तसेच धार्मिक, सांस्कृतिक वातावरण निर्माण केले आहे.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विभावरी नगरकर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार शिक्षिका मनीषा कांबळे यांनी मानले.

यावेळी सुरेंद्र व्यास, सौ. मीनाताई व्यास, ज्योत्स्ना पटेल, शोभा भावसार, सुनंदा भट्टड, माई कर्डक आदींसह पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# भिंगारमध्ये प्रभू श्रीरामांचा जन्मोत्सव उत्साहात; भव्य शोभायात्रेने दुमदुमली भिंगारची नगरी!

**• अहिल्यानगर । वीरभूमी–**

मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामचंद्र यांच्या जन्मोत्सवानिमित्त भिंगार शहरात अतिशय उत्साही आणि भक्तिमय वातावरणात भव्य मिरवणूक काढण्यात आली. या भव्य सोहळ्याचे आयोजन 'प्रभू श्रीराम जन्मोत्सव समिती, भिंगार' आणि 'सकल हिंदू समाज' यांच्या वतीने करण्यात आले होते. 'जय श्रीराम'च्या जयघोषाने आणि ढोल–ताशांच्या गजराने संपूर्ण परिसर राममय झाला होता. दक्षिणमुखी हनुमान मंदिरापासून सुरू झालेली ही मिरवणूक भिंगार वेस येथील मारुती मंदिरापर्यंत अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली.

मिरवणुकीचा मार्ग आणि उत्साह विजयनगर चौकातील दक्षिणमुखी हनुमान मंदिरापासून शोभायात्रेला प्रारंभ झाला. तेथून ही मिरवणूक पंचशील वेस, खळेवाडी, नेहरू चौक, ब्राह्मण गल्ली मार्गे भिंगार वेस येथील मारुती मंदिरात पोहचली. मिरवणुकीच्या मार्गावर ठिकठिकाणी रांगोळ्या काढून आणि भगवे ध्वज लावून स्वागत करण्यात आले. सकल हिंदू समाजाच्या वतीने ठिकठिकाणी पुष्पवृष्टी करून मिरवणुकीचे स्वागत करण्यात आले.

आकर्षक देखावे आणि वेशभूषा या मिरवणुकीचे मुख्य आकर्षण म्हणजे प्रभू श्रीरामांची भव्य मूर्ती आणि बाहुबली हनुमानाचे दोन जिवंत देखावे होते, ज्यांनी भाविकांचे लक्ष वेधून घेतले. चि. स्वराज सतीश मोरे याने प्रभू श्रीराम, कु. संस्कृती सतीश मोरे आणि कु. रोशनी लाहुंडे यांनी सीतामाता आणि चि. शौर्य अंकुश तरवडे याने छत्रपती शिवाजी महाराजांची वेशभूषा साकारली होती. या चिमुकल्यांच्या वेशभूषेचे सर्वांनी कौतुक केले.

सांस्कृतिक आणि साहसी प्रात्यक्षिके मिरवणुकीत ढोल–ताशा पथकाच्या तालावर तरुणाई थिरकली, तर दुसरीकडे लाठी–काठी आणि तलवारबाजीची चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर करून हिंदुत्ववादी शौर्याचे दर्शन घडवण्यात आले. हरिओम माऊली भजनी मंडळाच्या भजनांनी वातावरणात चैतन्य निर्माण केले. भक्तांचा प्रतिसाद यावर्षी लक्षणीय होता.

प्रबोधनात्मक उपक्रम केवळ उत्सवच नव्हे तर सामाजिक भान जपण्यासाठी या मिरवणुकीत 'लव जिहाद' या विषयावर प्रबोधन करण्यात आले. समाजातील ज्वलंत विषयावर जनजाग्रुती करण्याचा हा प्रयत्न उपस्थितांनी वाखाणला. मान्यवरांची उपस्थिती

या सोहळ्यासाठी श्रीराम नवमी उत्सव समितीचे अध्यक्ष सतीश (नाना) मोरे, युवा उद्योजक महेश झोडगे, रोहित सोनूशेठ भुजबळ, सचिन जाधव, युवा उद्योजक अमित खामकर, युवा उद्योजक सुरजजी रवे, उद्योजक सचिन सुसे, उद्योजक सचिन पेंडूरकर, अंकुश तरवडे, सुरज रवे, अशोक चेमटे, अभिषेक भगवाने, अजय गायकवाड, सुमित नकवाल, तुषार लोंढे, शुभम जगताप, राहुल लिपारे, जितेन नायर, आदी ससाने, उद्धव शिंदे, जगताप सर, ओंकार फिरोदे,



शिवम भंडारी, दिनेश हिरगुडे, राहुल गुलदगड, यांसह अनेक मान्यवर आणि मोठ्या संख्याने रामभक्त उपस्थित होते. प्रभू श्रीराम जन्मोत्सव समिती, भिंगार आणि सकल हिंदू समाजाच्या कार्यकर्त्यांनी या मिरवणुकीच्या यशस्वीतेसाठी मोठे परिश्रम घेतले.

# प्रताप ढाकणेंचा 'जय श्रीराम'चा नारा तर आ. राजळेंनी वाजविलेला ढोल चर्चेत

## पाथर्डीत रामनवमी मिरवणुकीत राजकीय चर्चांना उधाण । ढाकणे-भाजप समीकरण चर्चेत, राजळेंची भूमिका ठळक

**● पाथर्डी । वीरभूमी –**
राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अ‍ॅड. प्रताप ढाकणे यांनी प्रथमच जाहीररीत्या जय श्रीरामची दिलेली हाक... मतदारसंघात रामराज्य प्रस्थापित करण्यासाठी नेहमीप्रमाणे रामनवमीच्या मिरवणुकीत आमदार मोनिका राजळे यांनी वाजवलेला रामराज्याचा ढोल... ढोलावर मारलेले आत्मविश्वासपूर्ण स्ट्रोक... कुणाच्या डोक्यावर किंवा दातावर स्ट्रोक बसेल याची चिंता नसली तरी प्रतापरावांनी मात्र आवाज ऐकून गूढ हास्य करत रामभक्तांना हात जोडून 'जय श्रीराम' म्हणत त्यांना श्रीरामरूपी देवेंद्र यांचे स्मरण व्हावे, अशी देहबोली सर्वांच्याच नजरेत भरली. आमदार राजळे नेहमीच ढोल वाजवतात; पण यावर्षी ढाकणेंचा श्रीराम अगोदर झाला. त्यानंतर राजळे यांनी ढोल वाजवल्याने चर्चा सुरू झाली.

हिंदू रक्षा मंच व हिंदुत्ववादी प्रमुख संघटनांच्या पुढाकाराने गेल्या बारा वर्षांपासून शहरात श्रीराम जन्मोत्सव व भव्य मिरवणुकीचे शानदार आयोजन होत आहे. यामुळे तरुणाईमध्येही धार्मिक विचारांची पताका रोवली जात आहे. पक्षीय राजकारणापासून हा उत्सव लांब राहिल्याने सर्वपक्षीय कार्यकर्ते यात सहभागी होतात.

यंदा सोशल मीडियाचा पुरेपूर वापर करत कार्यकर्त्यांनी वलयांकित व्यक्ती, संत-महंतांच्या चित्रफिती व्हायरल करत उत्सवपूर्व चांगले वातावरण निर्माण केले. राष्ट्रवादीचे नेते अ‍ॅड. प्रताप ढाकणे यापूर्वीच्या मिरवणुकांमध्ये सहभागी झालेले होते; काही वेळा त्यांनीही ढोल वाजवला. कालच्या मिरवणुकीत मात्र कार्यकर्त्यांना मिरवणुकीची क्लिप देताना त्यांनी जय श्रीरामचा जयघोष केला. मिरवणुकीतही ते आले; मात्र ढोल वाजवला नाही. आमदार राजळे यांनी ढोल वाजवला; मात्र ढाकणे यांच्या क्लिपवर भाष्य टाळले.

रामनवमीच्या मिरवणुकीचे वैशिष्ट्य म्हणजे तेथे भाषणबाजीला संधी नसते. बहुतेक नेते, कार्यकर्ते, मिरवणुकीत सहभागी सर्वजण उपस्थिती लावून अस्तित्वाची जाणीव देतात. मुक्या मनाचे मुके बोल व्यक्त करायला कोणालाही संधी मिळत नाही. यंदा मात्र चित्रफितीच्या माध्यमातून अनेकांचे चेहरे मोबाईल स्क्रीनवर जय श्रीराम म्हणताना पाहून उत्सवाचे आयोजक कार्यकर्तेही सुखावले. नेटके, भव्य व शिस्तबद्ध आयोजनामुळे येथील उत्सव जिल्ह्यातील प्रमुख उत्सवांपैकी एक मानला जातो.

अ‍ॅड. प्रताप ढाकणे गेल्या काही दिवसांपासून भाजपबरोबर लिव्ह-इन फ्रेंड रिलेशनशिप प्रमाणे राहत आहेत. भाजपमधील अनेक ज्येष्ठ नेत्यांबरोबर त्यांचे मैत्रीपूर्ण संबंध आहेत. भाजपच्या उंबरठ्यावर बसल्याचे त्यांच्या बोलण्यातून लपूनही राहिलेले नाही. श्रीरामाचे नाव घेताना त्यांच्या देहबोलीत उंबरठा ओलांडण्याची ओढ अनेकांना जाणवली. मिरवणुकीइतकीच चर्चा ढाकणे यांच्या चित्रफितीची सुरू झाल्याने लिव्ह-इनचे रूपांतर गृहप्रवेशात कधी होते, याकडे समर्थकांचे लक्ष लागले आहे.

मागील आठवड्यात करंजी येथील कार्यक्रमात बोलताना आपण कुठल्याही पक्षातर्फे बोलत नाही, असे त्यांनी कार्यकर्त्यांसमोर स्पष्ट केले होते. अडचणीच्या काळात मदतीचा हात देत भाजपने अप्रत्यक्षपणे प्रताप ढाकणे यांच्याबरोबरचा घरोबा मान्य केला; पण काडीमोडानंतरचा संसार साक्षीदारांसमोर सुरू व्हावा, असे वातावरण तयार झाले असताना ज्यांना मानपान द्यावा त्यातलेच काहीजण समक्ष तुतारी, तर पाठीमागे पिपाणी वाजवू लागले.

शहरात लोकनेते स्व. बबनराव ढाकणे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या अनावरणासाठी ढाकणे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची तारीख हवी आहे; तर आमदार मोनिका राजळे यांना लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या पूर्णाकृती पुतळा, पोलीस स्टेशन व पालिकेच्या इमारतीच्या उद्घाटनासाठी मुख्यमंत्री हवेत. ढाकणे-मुंडे या दोन्ही नेत्यांचे संबंध शेवटच्या काही वर्षांत फारसे सलोख्याचे राहिले नव्हते. दुर्दैवाने सुमारे सहा महिन्यांपासून दोन्ही नेत्यांचे पुतळे झाकून ठेवलेले आहेत.

बजाओ ढोल स्वागत के, मेरे घर राम आये हैं अशी धून वाजवण्यासाठी तालुक्यात





ढाकणे-राजळे या दोन्ही नेत्यांना ओढ लागली आहे. नगर जिल्ह्यात दोन पायांची शर्यत खेळण्याची मुख्यमंत्र्यांची मानसिकता अद्याप दिसत नाही. ढाकणे यांच्या पक्षप्रवेशाच्या रिक्षाची मागील दोन चाके दोन्ही नेत्यांनी ताकदीने फिरवली, तरी पुढचे चाक प्रवरेचे आहे व एक्सिलरेटर परळीचे आहे. हा गुंता कसा सुटणार आणि सहमतीची रिक्षा कशी धावणार, हा प्रश्न राजकीय अभ्यासकांना पडला आहे.

मुख्यमंत्रीरूपी रामाला बोलवण्यासाठी काही रामभक्त मुंबईला गेले होते. तुम्ही आधी प्रवरास्नान करून पवित्र व्हा, प्रवरामाईचा आशीर्वाद घ्या; मग पुढे पाहू, असे सांगत पंचमुखी हनुमान सेनेला माघारी पाठवण्यात आले. त्यातच मावशीबाई सुद्धा पाथर्डीबाबत आता मोकळेपणाने बोलायला तयार नाहीत.

तालुक्यापुरते मात्र विरोधकांनाही आपलेसे करत 'रामराज्य' आणण्याचे आमदार मोनिका राजळे यांचे धोरण म्हणजे राजकीय हालचालींना अफूची गोळी देण्यासारखे ठरत आहे. दोन्ही बाजूंचे कार्यकर्ते एखाद्या साधूच्या आश्रमासारखे वागत परस्परांतील वैर विसरले आहेत.

आमदार मोनिका राजळे यांना कार्यकर्त्यांना अधूनमधून ढोलाचे बोल ऐकवायला आवडते. काहीजण त्या तालावर डोलतात, काहींना ढोलाचा टोला बसतो, तर काहीजण रिंगणातील इतरांकडे पाहून काय करायचे ते ठरवतात. रामनवमीचा उत्सव संपला असला तरी त्यातून निर्माण झालेल्या राजकीय चर्चांचा प्रभाव अजूनही कायम आहे. ढोलाचा आवाज थांबला असला तरी त्याचे पडसाद स्थानिक राजकारणात पुढील काळात उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

---

# पूर्व पापाने नजर गढूळ झाल्याने विरोधकांना पाणी स्वच्छ दिसेना : सोनल अजमेरे

**● कोपरगाव । वीरभूमी –**
नगरपरिषदेने नवीन पदाधिकारी निवडून आल्यानंतर मोठ्या प्रमाणावर विकास कामांना गती दिली आहे. नागरिकांचे मूलभूत प्रश्न पाणी स्वच्छता आरोग्य यावर विशेष भर दिला जातो आहे. पूर्वी प्रशासकीय काळात लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे शहराला प्रचंड अस्वच्छ पाण्याच्या त्रासाला सामोरे जावे लागले. पाण्याच्या फिल्टरेशन प्लांट वर असलेली वस्तुस्थिती आम्ही नगराध्यक्ष पराग संघाने स्वतः जाऊन पोलखोल केली होती. वास्तविक पाहता त्यामध्ये मोठे काम गेल्या दोन महिन्यात झाले आहे. पाण्याची गुणवत्ता सुधारल्याने विरोधकांचे अपप्रचाराचे स्वप्न गढूळ झाले आहे अशी टीका नगरसेविका सोनल अजमेरे यांनी विरोधकांवर



केली आहे.

विरोधकांना शहरात त्यांचा झालेला पराभव अद्यापही पचवता येत नाही. यापूर्वीच्या काळात आपण करून ठेवलेला गढूळपणा स्वच्छ करण्यात वेळ जातो आहे.यासह प्रभागात झालेली कामे श्रेय घेण्यासाठी स्वतःच सोशल मीडियावर टाकायची आणि नंतर पालिकेत येऊन निवेदनाचे नाटक करायचे असा दुटप्पी कारभार करणाऱ्यांना जनता पूरती ओळखून आहे. स्वप्नभंग झाल्यामुळे काहींना पूर्वीपेक्षा पाण्याची गुणवत्ता सुधारली आहे व आता मिळणाऱ्या स्वच्छ पाण्यातही गढूळ राजकारण करण्याची हौस आलेली आहे.

कितीही नौटंकी केली तरी विरोधकांना जनता भूलणार नाही. स्वतः चुकीचे कामे करायची, जनतेच्या मूलभूत प्रश्नात स्वार्थाचे राजकारण साधायचे आणि होणाऱ्या कामांना नाकाबुल जायचे अशी संभ्रमावस्था विरोधकांची झाल्याने ते पालिकेवर टीका करत आहे.

नागरिकांच्या येणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी नगराध्यक्ष पराग संधान व नगरसेवक व प्रशासन हे सक्षम आहे. ज्यांचे दिवास्वप्न भंग झाले म्हणून त्यांना राजकारण करायचे असेल तर त्यांना उत्तर योग्य पद्धतीने मिळेल असा इशारा सोनल अजमेरे यांनी दिला आहे.

---

# दिलेला शब्द न पाळणाऱ्या व गलिच्छ राजकारण करणाऱ्याबरोबर तडजोड नाही : उपसभापती गोवर्धन परजणे

## लोकप्रतिनिधी व इतर ज्येष्ठ मान्यवरांच्या उपस्थितीबाबतचा जाहीर खुलासा करा

**● कोपरगाव । वीरभूमी –**
मोठा गाजावाजा करून कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक बिनविरोध केल्याचे सांगतात. सहकारी गटांशी गोडबोलून सभापती पद पदरात पाडून घेतात, अडीच वर्ष सभापती पदाचा राजीनामा देण्याबाबत ठरल्याप्रमाणे सहा महिने होवूनही त्याबाबत चकार शब्द काढत नाही. कार्यक्रम पत्रिका छापतांना राजशिष्टाचार न पाळता सभापतीपदाचा गैर वापर करून ज्येष्ठांचा अनादर करतात. अशा कुटील राजकारण करणाऱ्यांशी दिलेला शब्द न पाळणाऱ्या व गलिच्छ राजकारण करणाऱ्याबरोबर कधीही तडजोड करणार नसल्याचे कोपरगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे



उपसभापती गोवर्धन परजणे यांनी म्हटले आहे.

त्यांनी पुढे असे म्हटले आहे की, युवा नेते एकीकडे निवडणूक बिनविरोध केली असल्याचे सांगतात व यापुढेही सहकारात निवडणुका बिनविरोध करणार असल्याच्या वल्गना करतात. त्यांनी सहकाराच्या निवडणुकीत दिलेला शब्द न पाळण्याची परंपरा सुरु ठेवली याचे उत्तर तालुक्यातील शेतकऱ्यांना द्यावे. निवडणुकीत दिलेल्या शब्दाप्रमाणे मी माझ्या अडीच वर्षाचा कार्यकाल पूर्ण होण्याच्या एक महिना अगोदरच माझ्या पदाचा राजीनामा दिला असून जवळपास सहा महिन्याचा कालावधी पूर्ण झाला आहे. परंतु सत्तेचा हव्यासापायी आजतागायत माझा राजीनामा मंजूर केलेला नाही आणि त्यांच्या सभापतीपदाच्या राजीनाम्याबाबत देखील त्यांच्याकडून चकार शब्द काढला जात नाही, याचे पण उत्तर त्यांनी तालुक्यातील शेतकऱ्यांना द्यावे असा खडा सवाल उपसभापती गोवर्धन परजणे यांनी केला आहे.

कोणताही शासकीय, राजकीय कार्यक्रम असो त्या कार्यक्रमात राजशिष्टाचारानुसार पालकमंत्री, माजी लोकप्रतिनिधी यांना त्या कार्यक्रमात योग्य तो मानसन्मान देणे गरजेचे आहे. परंतु कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकेत सत्तेच्या हव्यासापोटी व आपला मोठेपणा मिरविण्यासाठी राजशिष्टाचाराची तोडमोड केली हे सर्वसामान्य जनता कधीच मान्य करू शकत नाही.

### काळे गटाच्या भूमिकेशी परजणे, औताडे गट सहमत आहे का?

■ कोपरगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या शेतकरी भवनाच्या भुमीपुजन कार्यक्रमात काळे गटाचे उपसभापती व सर्व सदस्य अनुपस्थित राहण्याबाबत त्यांनी एक दिवस अगोदरच प्रसिद्धीपत्रक जाहीर केले होते त्यामुळे आ. आशुतोष काळे हे देखील कार्यक्रमाला उपस्थित राहणार नाहीत हे जवळपास निश्चित होते आणि घडलेही तसेच. परंतु या कार्यक्रमात आ. आशुतोष काळे व त्यांच्या गटाच्या सदस्यांबरोबरच मा.जिल्हा परिषद सदस्य राजेश परजणे व शिवसेना नेते नितीन औताडे यांच्यासह त्यांचे सर्व सदस्य व कार्यकर्तेही अनुपस्थित होते. यावरून काळे गटाने घेतलेल्या भूमिकेशी परजणे, औताडे गट एकप्रकारे सहमत आहे का? याबाबत तालुक्यात उलट सुलट चर्चांनी जोर धरला आहे.

---

# केंद्राच्या योजना समाजापर्यत पोहचविण्याचे काम जनसेवा फाउंडेशन करते : सौ. विखे पाटील

**● अकोले । वीरभूमी –**
तालुक्यातील २४६ दिव्यांग लाभार्थ्यांना सुमारे ३९ लाख ३० हजार रुपयांचे साधन साहित्य वितरीत करण्यात आले. भारत सरकारच्या सीएसआर योजने अंतर्गत भारतीय कृत्रिम अंगनिर्माण निगम व जिल्हा दिव्यांग पुर्नवसन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग व्यक्तिंना साधन साहित्य उपलब्ध करुन देण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिव्यांग व्यक्तीसाठी सुरू केलेल्या योजनेचा लाभ समाजातील शेवटच्या माणसाला मिळवून देण्याचे काम जनसेवा फाउंडेशनच्या माध्यमातून सुरू असल्याचे प्रतिपादन सौ.धनश्री विखे पाटील यांनी याप्रसंगी केले.

जिल्ह्यांचे पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून आणि भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ.सुजय विखे पाटील यांच्या सहकार्याने तालुक्यातील दिव्यांग व्यक्तिंना साधन साहित्य उपलब्ध करुन देण्यासाठी नोंदणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. पात्र लाभार्थ्यांना रणरागीणी महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ.धनश्री विखे पाटील, राजुर ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच श्रीमती हेमलता पिचड, भाजपाचे सरचिटणीस सिताराम गायकर, अगस्ती सहकारी साखर कारखान्याच्या उपाध्यक्षा श्रीमती सुनिता भांगरे यांच्या उपस्थितीत लाभार्थ्यांना साधन साहित्य वितरीत करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना सौ.धनश्री विखे पाटील म्हणाल्या की, केंद्र सरकारच्या माध्यमातून या पुर्वीही जिल्ह्यातील अनेक दिव्यांग व्यक्तिंना तसेच जेष्ठ नागरीकांना साधन साहित्य वितरीत करण्यासाठी पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील आणि डॉ.सुजय विखे पाटील यांनी पुढाकार घेतला होता. सामाजिक बांधिलकीने विखे पाटील परिवार यासाठी सातत्याने कार्यरत असून, जिल्हा दिव्यांग पुर्नवसन केंद्राच्या माध्यमातून याबाबतचा पाठपुरावा सातत्याने सुरु असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा श्रीमती हेमलता पिचड यांनी या उपक्रमाचे कौतूक करुन, दिव्यांग व्यक्तिंप्रमाणेच जेष्ठ नागरीकांनाही राष्ट्रीय वयोश्री योजनेच्या माध्यमातून साधन साहित्य देण्यासाठी शिबीर आयोजित करण्याचे आवाहन केले. यापुर्वी स्व.मधुकरराव पिचड यांच्या माध्यमातून जनतेसाठी मोठया प्रमाणात कामं केली. पाण्याच्या प्रश्नासाठी मोठे काम करून, जनसामान्यांना आधार



दिल्याचे त्यांनी सांगितले.

श्रीमती सुनिता भांगरे यांनी आपल्या मनोगतात विखे पाटील परिवाराची सामाजिक बांधिलकी व जनसामान्यांसाठी असलेले दायित्व हे खुप मोठे आहे. नोंदणी झाल्यानंतर अवघ्या पंधरा दिवसात साधन साहित्य उपलब्ध होते हे विखे पाटील परिवाराचे काम असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजपाचे सरचिटणीस सिताराम भांगरे यांनी केले. कार्यक्रमास नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, उपनगराध्यक्ष शरद नवले, भाजपाचे तालुका अध्यक्ष राहुल देशमुख, गिरीजाजी जाधव, रमेश राक्षे, यशवंतराव आभाळे, सुनिल दातीर, सुधाकरराव देशमुख, रावसाहेब वाकचौरे,अमोल वैद्य,विकास वाकचौरे, राजाराम वाकचौरे, निखिल जगताप, महिला मोर्चाच्या रेशमाताई गोडसे, कल्पना सुरपुरिया, भारती चासकर, साहेबराव दातखिळे यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

---

# आदिवासी शक्ती संघटनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
आदिवासी पारधी समाजातील १६ वर्षीय चेंग चिंगळ्या काळे यांच्या संशयास्पद मृत्यूने जिल्ह्यात खळबळ उडाली असून या प्रकरणाची सखोल चौकशी सीआयडीमार्फत करण्यात यावी, अशी जोरदार मागणी आदिवासी शक्ती संघटना व आदिवासी पारधी समाजाच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांना निवेदन देण्यात आले.

श्रीगोंदा तालुक्यातील वांगदरी येथील रहिवासी असलेल्या चेंग काळे याचा मृतदेह सुरेगाव येथील विहिरीत आढळून आला. विशेष म्हणजे, तो पोलिसांच्या ताब्यात असताना मृतावस्थेत कसा आढळला, याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

निवेदनानुसार, २३ मार्च २०२६ रोजी पहाटे पोलिसांनी बाबुशा काळे, शुभम काळे, चेंग काळे व रवी भोसले या चौघांना चौकशीच्या नावाखाली ताब्यात घेतले.

त्यावेळी त्यांना मारहाण करून दोन वाहनांमधून नेण्यात आल्याचे प्रत्यक्षदर्शी पूजा काळे यांनी पाहिल्याचा दावा करण्यात आला आहे. पुढे त्यांना बेलवंडी पोलीस ठाणे, पोलीस अधीक्षक कार्यालय (अहिल्यानगर), श्रीरामपूर व अकोले येथे नेण्यात आल्याचे सांगितले जाते.

---

# शिरीष टेकाडे सरांच्या मार्गदर्शनाने अनेक यशस्वी पिढ्या घडल्या : रामचंद्र दरे

## प्राचार्य शिरीष टेकाडे यांच्या सेवापूर्तीनिमित्त संस्थेच्या वतीने गौरव

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
टेकाडे सरांच्या मार्गदर्शनाने अनेक यशस्वी पिढ्या घडल्या. त्यांनी घडवलेली अनेक मुले उच्च पदावर कार्यरत आहे. विद्यार्थ्यांना त्यांनी मौल्यवान ज्ञान आणि जीवनाचे धडे देताना जिल्हा मराठा संस्थेचा नावलौकिक वाढवला असल्याचे प्रतिपादन जिल्हा मराठा संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे यांनी केले.

देहरे (ता. नगर) येथील नवभारत माध्यमिक व उच्च माध्यमिक उद्यालयाचे प्राचार्य शिरीष टेकाडे यांच्या सेवापुर्ती गौरव समारंभा प्रसंगी अध्यक्षीय भाषणात दरे बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, खजिनदार अ‍ॅड. दिपलक्ष्मी म्हसे, विश्वस्त जयंत वाघ, कार्यकारिणी सदस्य दिपकराव दरे, माजी जि.प. सदस्य संदेश कार्ले हे होते.

याप्रसंगी प्राचार्य शिरीष टेकाडे व सौ. उज्वला शिरीष टेकाडे यांचा मान्यवरांच्या हस्ते सपत्नीक सन्मान करण्यात आला. यावेळी उपाध्यक्ष डॉ. भापकर म्हणाले, गेली ३२ वर्ष टेकाडे सरांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन घडले. त्यांनी आपल्या कारकिर्दीत देहरे शाळेची खूप प्रगती केली. उत्कृष्ट आणि मेहनती मार्गदर्शक म्हणून त्यांनी वेगळा ठसा उमटवीला असल्याचे स्पष्ट केले.

खजिनदार अ‍ॅड. दिपलक्ष्मी म्हसे म्हणाल्या की, मुख्यध्यापक हे संस्थेच्या यशाचे पिलर असून जिल्हा मराठा संस्थेत टेकाडे सरांसारखे अनेक मौल्यवान लोकं आहेत. शाळेच्या भरभराटीसाठी प्रयत्न करत असताना त्यांना पत्नीची चांगली साथ लाभल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यकारिणी सदस्य दीपक दरे म्हणाले, देहरे येथील इंग्लिश मीडियम स्कूल तसेच ज्युनिअर कॉलेजचे रोपटे वाढविण्यात टेकाडे सरांचे मोलाचे योगदान आहे. विद्यार्थ्यांना त्यांनी फक्त अभ्यास शिकवला नाही तर जीवन जगण्याची कला शिकविली. माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन आप्पासाहेब शिंदे यांनी नवभारत विद्यालयाचे भौतिक वैभव निर्माण करण्याचे काम टेकाडे सरांनी केल्याचे सांगितले.

सत्काराला उत्तर देताना प्राचार्य टेकाडे म्हणाले की, संस्थेमुळे टेकाडे परिवार घडला, त्यामुळे संस्थेचे आपण कधीही उतराई करु शकत नाही. वडिलांनी दिलेल्या संस्काराच्या बळावर आयुष्यभर काम केले, ते करत असताना पत्नीने मोलाची साथ दिल्याचे सांगितले. प्रास्ताविकातून पर्यवेक्षक अंकुश बर्डे यांनी प्राचार्य शिरीष टेकाडे यांच्या जीवन पटाचा लेखाजोखा मांडला. या कार्यक्रमासाठी संस्था माजी निरीक्षक उत्तमराव राजळे, हरिभाऊ जावळे, तात्यासाहेब भापकर पांडुरंग गोरे, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक बाबासाहेब बोडखे, महेंद्र हिंगे, सुनील दानवे, विजयराव पठारे, सौ. वैशाली दारकुंडे, कल्याण ठोंबरे, बालाजी गायकवाड, शिवाजीराव लवांडे, सोसायटीचे सचिव स्वप्नील इथापे, प्राथमिक शिक्षकांचे नेते रावसाहेब रोहकले गुरुजी,



प्राचार्य दत्ता पाटील नारळे, राजेंद्र लांडे, अर्जुन भुजबळ, बाळासाहेब खिलारी, आदम शेख, बळीराम सातपुते, सुधाकर सुंबे, सुधाकर सुंबे, बाळासाहेब लोटके, संपत लोटके, गुलाबराव कार्ले, दिलीप गाडे, बाळासाहेब मुळे, व्ही.डी. काळे, संजय लांडगे, यासह जिल्हा शिक्षक संघटना, क्रीडा महासंघाचे अध्यक्ष नंदकुमार शितोळे व पदाधिकारी, विविध शाळांचे प्राचार्य, माजी, सहशिक्षक विद्यार्थी, देहरे गावचे आजी माजी सरपंच, उपसरपंच सदस्य, सेवासोसायटी अध्यक्ष, उपाध्यक्ष, आजी-माजी सैनिक संघटना, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक लष्कर व रोहिणी पवार यांनी केले. आभार माधवी कटारे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी नवभारत विद्यालय देहरे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, यांनी परिश्रम घेतले.